RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ७, अंक ७४]     बुधवार, जून १६, २०२१/ज्येष्ठ २६, शके १९४३     [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**गृहनिर्माण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जून २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६.**

क्रमांक सेप्रनि-२०२०/प्र.क्र.९९/गृनिभू.—महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र-२८) यांच्या कलम १८४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (एक) आणि कलम १९च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या सर्व इतर अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील " **मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी** " या पदावरील सेवा प्रवेश विनियमित करणारे पुढील नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २०२१" असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(ब) "प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (सन १९७७ चा महाराष्ट्र २८) याच्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.

३. प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अभियांत्रिकी सेवेतील मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी या पदावरील नियुक्ती माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी हे पद धारण करणाऱ्या व या पदावर ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व्यक्तीमधून गुणवत्तेच्या व ज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल. एमबीए किंवा संगणक अभियांत्रिकी/संगणक तंत्रज्ञान/संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी/माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकीमधील एम.ई./एम.टेक. ही अर्हता धारण केलेली व्यक्ती किंवा सॉफ्टवेअर/सॉफ्टवेअर डोमेन बाबत माहिती व अनुभव असलेल्या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा, अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळाली नसेल, तर तिला सदर परिक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाच्या अधिपत्याखालील, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही मंडळात/कार्यालयात, बदलीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. बा. तुंबारे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.